मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २४७ ✻ सातारा : सोमवार दि. २० मे २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# मुंबईसह महाराष्ट्रात १३ जागांवर आज मतदान

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे - उध्दव ठाकरेंची प्रतिष्ठा पणाला

## ४ केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री सुपूत्र आणि उज्वल निकमांचे भवितव्य ठरणार

**मुंबई :** देशातील पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या पाचव्या टप्प्याचे मतदान सोमवार २० मे रोजी होत आहे. ठाणे, कल्याण, भिवंडी, नाशिक, पालघर, दिंडोरी धुळ्यासह मुंबईतील सहा अशा १३ जागांवर मतदान होणार आहे. कल्याण लोकसभा मतदार संघाकडे राज्याचे लक्ष वेधले आहे. या मतदार संघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपूत्र डॉ श्रीकांत शिंदे हे निवडणूक लढवीत असून, शिंदेंसह केंद्रीय मंत्री पियुष गोयल, भारती पवार, कपिल पाटील, सुभाष भामरे हे मंत्री आणि वकील उज्ज्वल निकम यांचे भवितव्य ठरणार आहे. त्यामुळे या टप्प्यात शिंदे आणि ठाकरेंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. पाचव्या टप्प्यातील मतदानासाठी एकूण २४ हजार ५७९ मतदान केंद्रांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून, या निवडणुकीत २ कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहे.

मुंबईत लोकसभेच्या सहा जागा आहेत. यातील तीन जागांवर शिवसेना विरूध्द शिवसेना अशी थेट लढत होत आहे. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाचे उमेदवार अरविंद सावंत आणि शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार यामिनी जाधव यांच्यात लढत होत आहे. मुंबई उत्तर पश्चिम या मतदारसंघात ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तिकर विरुद्ध माजी मंत्री, शिंदे गटाचे उमेदवार रविंद्र वायकर असा सामना होत आहे. दक्षिण मध्य मुंबईतून ठाकरे गटाचे उमेदवार अनिल देसाई विरुद्ध शिंदे गटाचे उमेदवार राहुल शेवाळे यांच्यात मुख्य लढत होत आहे. या तिन्ही मतदार संघात महायुती विरूध्द महाविकास आघाडी अशी लढत असली तरीसुध्दा खरा सामना शिंदे विरूध्द ठाकरे असाच रंगणार आहे. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून महायुतीकडून केंद्रीय मंत्री पियूष गोयल तर महाविकास आघाडीने काँग्रेसचे भूषण पाटील अशी लढत आहे. उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून मविआच्या उमेदवार, माजी मंत्री वर्षा गायकवाड विरूध्द महायूतीचे उमेदवार ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम हे रिंगणात आहेत. मुंबई उत्तर पूर्व मतदार संघात महायुतीचे मिहिर कोटेचा महाविकास आघाडीचे संजय पाटील रिंगणात आहेत. मुंबईत होणा-या मतदानासाठी मुंबईत २ हजार ५२० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

कल्याण लोकसभेच्या लढाईकडे राज्याचे लक्ष लागलं आहे. या निवडणूक रिंगणात तब्बल २८ उमेदवार असले तरी खरी लढत शिवसेना शिंदे गटाचे डॉ श्रीकांत शिंदे आणि ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्यात खरी लढत होणार आहे. शिंदे यांची पाच लाखाचा लीड मिळेल यासाठी प्रयत्नशील आहेत तर शिंदेंना ठाण्याला परत पाठवून मशाल लोकसभेत पोहचेल असा विश्वास दरेकर यांना आहे. त्यामुळे या लढतीकडे राज्याचेच नव्हे तर देशाचे लक्ष वेधले आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघात एकूण २० लाख १८ हजार ९५८ मतदार आहेत तर एकूण १९६० मतदान केंद्र आहेत.

भिवंडीत तिरंगी लढत होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील हे महायुतीचे उमेदवार असून त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून सुरेश म्हात्रे (बाळयामामा) तर समाजसेवक निलेश सांबरे हे अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात आहेत. कपिल पाटील यांची सीट धोक्यात असून, पाटील यांचा पराभव झाल्यास भाजपला मोठया नामुष्कीला सामोरे जावे लागेल असेच चित्र या मतदार संघात दिसून येतय. त्यामुळे या लढतीकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

ठाणे लोकसभेत महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे राजन विचारे तर महायुतीकडून शिंदे गटाचे नरेश म्हस्के असा सामना रंगणार आहे.ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला समजला जात आहे. दिवंगत आनंद दिघे यांना मानणारा मोठा वर्ग आहे. दोघेही आनंद दिघे यांचे शिष्य आहेत. या मतदार संघात शिवसेना विरूध्द शिवसेना अशी लढत होत आहे. ठाण्याचा पराभव शिंदे आणि ठाकरे दोघांसाठी धक्कादायक ठरणार आहे त्यामुळे या लढतीकडे लक्ष लागून राहिले आहे.

पालघर लोकसभा मतदार संघात एकूण दहा उमेदवार रिंगणात आहेत. परंतू खरी लढत महायुतीचे हेमंत विष्णू सावरा आणि ठाकरे गटाच्या भारती कामडी आणि बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील यांच्यात होणार आहे. हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने शेवटच्या क्षणी बोईसरचे आमदार राजेश पाटील यांना उमेदवारी दिली. त्यामुळे येथे तिरंगी सामना होणार आहे.

नाशिक मतदार संघावर सुरूवातील भाजपने दावा केला होता. मात्र शिवसेना शिंदे गट विरूध्द भाजप अशी जोरदार रस्सीखेच झाली अखेर शिंदे सेनेच्या वाटयाला हा मतदार संघ मिळाला. छगन भुजबळ ही येथून इच्छूक होते. महायुतीकडून शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे रिंगणात आहेत त्यांच्याविरोधात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे आणि अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज निवडणुकीच्या रिंगणात आहेत. शांतीगिरी महाराजांमुळे ही निवडणूक चुरशीची होणार आहे.

धुळे लोकसभा मतदार संघात यंदा चुरशीची लढत होणार आहे.भाजपने विद्यमान खासदार डॉ सुभाष भामरे यांच्या विरोधात नाशिकच्या काँग्रेसच्या आमदार डॉ.शोभा बच्छाव यांना उमेदवारी मिळाली आहे. काँग्रेसच्या उमेदवार शोभा बच्छाव यांना वंचितचा उमेदवार माजी आयपीएस अधिकारी अब्दुर रेहमान यांच्यामुळे धोका असून तिरंगी सामना होणार आहे.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपने केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. त्यांच्याविरोधात महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसने भास्कर भगरे हे उमेदवार आहेत.यंदा या ठिकाणी चुरशीची लढत होणार आहे.

**मराठी मतांचे विभाजन निश्चितच ?**

मुंबईत अनेक भागात मोठ्या संख्येने मराठी मतदार आहेत. अनेक मतदारसंघात मराठी मतं निर्णायक सुद्धा ठरतात. मुंबईत सहा पैकी तीन लोकसभा मतदारसंघात शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होत आहे. या तीन मतदारसंघात मशाल विरुद्ध धनुष्यबाण या दोन चिन्हांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार विरुद्ध शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार यांच्यात मुख्य लढत होत आहे. यामुळे या मतदारसंघांमध्ये मराठी मतांचं विभाजन होईल असेच चित्र आहे. तर इतर दोन मतदारसंघांमध्ये मराठी विरुद्ध अमराठी उमेदवार अशी थेट लढत आहे. यामुळे सहापैकी पाच मतदारसंघांमध्ये मराठी मतदारांचा कौल हा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. यातही वंचित बहुजन आघाडीने ही स्वतंत्र उमेदवार दिल्याने अल्पसंख्याकांच्या मतांचं विभाजनही महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांमध्ये होईल असं स्पष्ट आहे. परंतु यंदाच्या निवडणुकीत शिवसेनेच्या दोन गटांत मराठी मतांचं विभाजन निश्चित समजलं जात आहे.

**राज ठाकरेंचा पाठींब्याचा किती फायदा**

मुंबईत मराठी अस्मितेसाठी म्हणून शिवसेनेचा जन्म झाला. सुरुवातीच्या काळात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसैनिकांनी मराठीच्या मुद्यावरच आंदोलनं केली आणि पक्षचा विस्तार केला.त्यानंतर राज ठाकरे यांनी मनसेची स्थापना करताना हीच भूमिका घेतली आणि त्यांना सुरुवातीला मराठी मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. मुंबईत काँग्रेसची पारंपरिक मराठी मतं सोडली तर एकगठ्ठा मराठी मतं ही शिवसेनेला मिळत आल्याचं दिसतं. मनसे हा पक्ष आल्यानंतर मराठी मतांचं विभाजन होताना दिसलं. यंदाच्या निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोदींना बिनशर्त पाठींबा दिला आहे.

## मान्सून अंदमान-निकोबारमध्ये धडकला ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होणार



**मुंबई :** भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) दिलेल्या माहितीनुसार मान्सून अंदमान-निकोबारमध्ये धडकला आहे. ३१ मे पर्यंत केरळमध्ये पोहोचेल. गेल्या वर्षीही अंदमान निकोबार बेटांवर १९ मे रोजी मान्सून दाखल झाला होता. मात्र, केरळमध्ये ९ दिवस उशिराने ८ जूनला पोहोचला होता.

यंदा मान्सून सामान्य तारखेपूर्वीच केरळमध्ये दाखल होऊ शकतो. तथापि, केरळमध्ये मान्सूनच्या आगमनाची सामान्य तारीख १ जून आहे. जाहीर केलेल्या तारखेत ४ दिवस कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. म्हणजेच २८ मे ते ३ जून दरम्यान कधीही मान्सून दाखल होऊ शकतो.

मान्सून ९ ते १६ जूनदरम्यान महाराष्ट्रात आणि राजस्थानमध्ये २५ जून ते ६ जुलैपर्यंत मध्य प्रदेशात पोहोचण्याची शक्यता आहे. तर यूपीमध्ये १८ ते २५ जूनपर्यंत आणि बिहार-झारखंडमध्ये १८ जूनपर्यंत पोहोचेल.

आयएमडीच्या आकडेवारीनुसार, केरळमध्ये मान्सूनच्या आगमनाच्या तारखा गेल्या १५० वर्षांमध्ये खूप वेगळ्या होत्या. १९१८ मध्ये, मान्सून ११ मे रोजी केरळमध्ये पोहोचला, तर १९७२ मध्ये, तो १८ जून रोजी सर्वात उशिरा केरळमध्ये पोहोचला. गेल्या चार वर्षांचे बोलायचे झाले तर २०२० मध्ये मान्सून १ जून, २०२१ मध्ये ३ जून, २०२२ मध्ये २९ मे आणि २०२३ मध्ये ८ जून रोजी केरळमध्ये पोहोचला.

**यावेळी 'ला निना'मुळे चांगला पाऊस अपेक्षित आहे**

'एल निनो' आणि 'ला निना' या दोन हवामान पद्धती आहेत. गेल्या वर्षी 'एल निनो' सक्रिय होता, तर यावेळी 'एल निनो'ची स्थिती या आठवड्यात संपली असून तीन ते पाच आठवड्यांत 'ला निना'ची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

## इराणचे राष्ट्रपती रईसी यांची हत्या?

**मुंबई :** इराणचे राष्ट्रपती इब्राहिम रईसी यांच्या हेलिकॉप्टला अपघात झाल्याचे वृत्त आल्यापासून आंतरराष्ट्रीय राजकारणात खळबळ उडालेली आहे.

हेलिकॉप्टर अपघाताचं वृत्त आल्यापासून रईसी यांच्याशी कुठलाही संपर्क होऊ शकलेला नाही. दरम्यान, या अपघाताच्या वृत्तानंतर अमेरिका सतर्क झाली असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन आपली सुट्टी स्थगित करून आणीबाणीच्या बैठकीसाठी व्हाई हाऊस येथे परतले आहेत. दरम्यान, इराणचे राष्ट्रपती इब्राहिम रईसी यांची हत्या झाली असण्याचा संशय अमेरिकेने व्यक्त केला आहे.इराणचे राष्ट्रपती इब्राहिम रईसी यांना घेऊन जात असलेलं एक हेलिकॉप्टर रविवारी पर्वतीय प्रदेशातून दाट धुक्यामधून मार्ग काढत असताना अपघातग्रस्त झालं होतं. दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला खोमेनी यांनी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेसोबत एक तातडीची बैठक घेतल्याचा दावा करण्यात येत आहे. इराणमधील वृत्तसंस्थांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार इब्राहिम रईसी यांच्यासोबच या हेलिकॉप्टरमध्ये इराणचे परराष्ट्रमंत्री हुसेन अमीर-अब्दुल्लाहियन आणि इतर अधिकारी उपस्थित होते. दुर्घटनेनंतर रईसी आणि अमीर अब्दुल्लाहिन यांच्या जीविताबाबत भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.दरम्यान, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्रपती रईसी यांच्या हेलिकॉप्टरला झालेल्या अपघाताबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच या कठीण प्रसंगी इराणच्या जनतेसोबत आपण उभे असल्याचे म्हटले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार इराणच्या राष्ट्रपतींच्या ताफ्यामध्ये तीन हेलिकॉप्टर होते. त्यामधील दोन आपल्या निर्धारित ठिकाणी सुरक्षितरीत्या पोहोचले. मात्र एक हेलिकॉप्टर हे अपघातग्रस्त झालं. इराणच्या सरकारी टीव्हीने सांगितले की, ही दुर्घटना इराणच्या राजधानीपासून सुमारे ६०० किमी दूर अंतरावर असलेल्या अझरबैजान या देशाच्या सीमेवर असलेल्या जोल्फा या शहराजवळ घडली. रईसी हे रविवारी अझरबैजानचे राष्ट्रपती इल्हाम अलियेव

## ...तर पक्ष तेव्हाच फुटला असता; शरद पवारांच्या दाव्यावर छगन भुजबळांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात शेवटच्या टप्प्यातील मतदानापूर्वी प्रचार तोफा थंडावल्या असल्या तरी राजकीय नेत्यांकडून दावे-प्रतिवादे सुरूच आहेत. २००४ साली काँग्रेसपेक्षा आमचे जास्त आमदार निवडून आल्यानंतर छगन भुजबळयांना मुख्यमंत्री केलं असतं तर आमचा पक्ष फुटला असता, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारयांनी नुकताच एका मुलाखती दरम्यान केला.

पवार यांच्या या दाव्यावर आताछगन भुजबळयांनीही प्रसारमाध्यमांशी बोलतानाआपली प्रतिक्रिया दिली आहे.तेव्हा अजित पवार हे नवखे होते, हे बरोबर आहे. मी आधीपासून पवार साहेबांसोबत होतो.



२००४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसपेक्षा आमच्या जागा जास्त निवडून आल्यानंतर काँग्रेस पक्ष आम्हाला मुख्यमंत्रिपद द्यायला तयार होता. मात्र पवारसाहेबांनीच मुख्यमंत्रिपद घेण्यास नकार दिल्याचं नंतर काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडून आम्हाला सांगण्यात आलं.

परंतु मला मुख्यमंत्रिपद दिलं असतं तर पक्ष फुटला असता, असं ते का म्हणाले हे मला माहीत नाही, अशा शब्दांत छगन भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली आहे.गौप्यस्फोट करतानाशरद पवारनक्की काय म्हणाले?२००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा मुख्यमंत्री झाला असता पण पक्ष नेतृत्वाने ते पद काँग्रेसला दिले, असा आरोप अजित पवार यांनी केला होता.

या आरोपाला उत्तर देताना शरद पवार म्हणाले, २००४ मध्ये मुख्यमंत्रिपदाबाबत निर्णय फार विचारपूर्वक घेण्यात आला होता. तेव्हा अजित पवार यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपविण्याचा प्रश्न नव्हता. कारण ते फारच नवखे होते.

मुख्यमंत्रिपदासाठी कोणी योग्य नेता आमच्याकडे नव्हता. तेव्हा छगन भुजबळ यांच्याकडे मुख्यमंत्रिपद दिले असते तर भविष्यात पक्षात फूट पडली असती.त्यामुळे अधिकची मंत्रिपदे आणि खाती मिळवून मुख्यमंत्रिपद काँग्रेसकडे कायम ठेवण्याचा निर्णयावर आम्ही आलो, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचे निधन



**सातारा :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी वृद्धापकाळाने सातारा जिल्ह्यातील भुईंज येथील निवासस्थानी निधन झाले. भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ करणाऱ्या प्रतापराव भोसले यांनी ४ वेळा आमदार म्हणून वाई खंडाळा विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करताना कॅबिनेट मंत्री म्हणून यशस्वी काम केले. त्यानंतर ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाने रिक्त झालेल्या सातारा लोकसभा मतदार संघातून ३ वेळा संसदेत खासदार म्हणून प्रतिनिधीत्व केले. या काळात विविध राष्ट्रीय समित्यांवर महत्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यानंतर त्यांनी १९९७ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून गेलेली सत्ता पुन्हा आणून महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली आघाडीचे सरकार स्थापन केले.

या कालावधीत ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण, देशभक्त आबासाहेब वीर यांच्या नेतृत्वाखाली काम करताना धोम, कण्हेर धरण, किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना, जनता शिक्षण संस्थेच्या उभारणीसह कृषी, सहकार क्षेत्रासह संस्थात्मक कामकाजात मोलाचे योगदान दिले.

अत्यंत सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न, विचारांची पक्की बैठक आणि स्वाभिमान जपणारे नेतृत्व म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख होती. प्रतापराव भोसले यांच्या पश्चात माजी आमदार मदन भोसले, मोहनराव भोसले, गजानन भोसले हे तीन सुपुत्र, विवाहित कन्या पद्मादेवी पाटील, सूना, नातवंडे, परतुंडे असा परिवार आहे.

## काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचाराची जननी, त्यांना विकासाची - BCD माहिती नाही

### पंतप्रधान मोदी विरोधकांवर बरसले!

**मुंबई :** झारखंडमधील जमशेदपूरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चावर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेसही भ्रष्टाचाराची जननी आहे. काँग्रेस आणि झामुमोच्या लोकांना विकासाची पर्वा नाही. त्यांचा संबंध फक्त भ्रष्टाचार आणि खोटे बोलण्याशी आहे. काँग्रेस आणि झामुमोने आपल्या घरात काळ्या पैशाचा ढीग ठेवला आहे, अशा शब्दांतपंतप्रधानमोदींनी त्यांच्यावर टीका केली.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, काँग्रेस आणि झामुमोसारख्या पक्षांनी झारखंडला लुटण्याची एकही संधी सोडली नाही. काँग्रेस ही भ्रष्टाचाराची जननी आहे. काँग्रेस आणि झामुमोच्या लोकांना विकासाचा ABCD सुद्धा माहित नाही. गरिबांच्या मालमत्तेचा एक्स-रे काढणे, एससी-एसटी-ओबीसीचे आरक्षण हिसकावणे, मोदीजींना रोज शिव्या देणे हे त्यांचे काम आहेत. या पलीकडे ते विचार करू शकत



नाहीत.झारखंडमध्ये झामुमोने जमीन घोटाळा केला. त्यांनी गरीब आदिवासींच्या जमिनी बळकावल्या, लष्कराच्या जमिनी बळकावल्या. त्यांच्या घरातून जप्त झालेल्या चलनी नोटांचे डोंगर तुमच्याकडून लुबाडलेले आहेत. या अप्रामाणिक लोकांच्या घरात लपून बसलेला पैसा आता मोदी शोधून काढतोय. मी हे पैसे सरकारी तिजोरीत नेण्यासाठी वसूल करत नाही तर मी हे सर्व पैसे ज्यांच्या मालकीचे आहेत, त्या गरीब लोकांना परत करण्याचा मार्ग शोधत आहे. ही मोदींची गॅरंटी आहे, असा विश्वास त्यांनी लोकांना दिला. काँग्रेस पक्ष उद्योजकांना देशाचे शत्रू मानतो. जे उद्योगपती त्यांना पैसे देत नाहीत, त्यांच्यावर ते हल्ला करतात, म्हणजेच काँग्रेस आणि झामुमोसारख्या पक्षांना देशातील उद्योगांची चिंता नाही. त्यांचे नेते असे उघडपणे सांगतात. ते त्यांच्या भ्रष्टाचार आणि खंडणीशी संबंधित आहेत. काँग्रेसचे राजपुत्र उद्योग, उद्योगपती आणि गुंतवणुकीला रोज विरोध करतात. येत्या काळात कोणता उद्योगपती त्यांच्या राज्यात जाऊन भांडवल गुंतवणार आहे? त्या राज्यातील तरुणांचे काय होणार? असा सवालही मोदींनी केला.

## वळतीत बिबट्याचा वावर वाढला

### शेतकरी बिबट्याच्या दहशतीखाली करतात शेतीची कामे



**वळती :** वळती ( ता . आंबेगाव )येथील मालजे वस्तीत बिबट्याचा वावर वाढला आहे . शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन नित्याचेच होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

वळती गावच्या पूर्वेला मालजे वस्ती आहे. येथे शेतकरी बाबा मंदिर परिसरात ओढ्याचे पात्र आहे . येथे उसाचे क्षेत्र देखील जास्त आहे . शनिवारी ( दि. १८ ) सायंकाळी सहा वाजता सुमारास दत्ता भोर हे शेतकरी जनावरांसाठी मका कापण्यास ट्रॅक्टर घेऊन चालले होते . तेव्हा शेतकरी बाबा मंदिर परिसरात रस्त्याच्या कडेला बिबट्या बसलेला त्यांना दिसला . त्यांनी ट्रॅक्टरचा हॉर्न वाजवला . परंतु बिबट्या जागेवरून हलला नाही. दत्ता भोर यांनी मोबाईल काढून बिबट्याचे शुटींग केले . त्यानंतर बिबट्या तेथून सावकाशपणे निघून गेला .या प्रकारामुळे मालजेवस्ती परिसरातील शेतकऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे. दोन दिवसांपूर्वी येथील रवींद्र विठ्ठल भोर यांचे कुत्रे बिबट्याने पळवले होते. या परिसरात अनेक शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन नित्याचेच झालेले आहे.

शेतकऱ्यांना शेतीची कामे बिबटयाच्या दहशतीखाली करावी लागत असल्याने शेतकरी हवालदील झाला आहे . वनविभागाने मालजेवस्तीत पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी भाऊसाहेब भोर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रवींद्र भोर, दत्ता भोर आदी शेतकऱ्यांनी केली आहे.

## संपादकीय

# नक्षलवाद्यांच्या शेवटाची सुरुवात



छत्तीसगड व तेलंगणाच्या सीमावर्ती भागातून गडचिरोलीत माओवाद्यांच्या कुरापती नित्याच्या निवडणुका आल्या म्हणजे 'बुलेट विरुद्ध बॅलेट' असा संघर्ष आणखीच तीव्र होतो, हा अनुभवही नेहमीचाचा २९ मार्च २०२४ रोजी माओवाद्यांनी भामरागड तालुक्यात पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयाने एका आदिवासी तरुणाची हत्या केली. त्यानंतर मतदानावर बहिष्कार घालण्याचा फतवा काढला.या घटनेमुळे २०१९ च्या निवडणुकीच्या जखमांवरची खपली निघाली.

गेल्यावेळी तब्बल १५ जवानांसह तीन नागरिकांचा बळी गेला होता. यावेळी मात्र चित्र बदलले. नक्षलग्रस्त भागातल्या मतदानाच्या फक्त तीन दिवस आधी १६ एप्रिल रोजी गडचिरोलीच्या सीमेवरील कांकेरच्या जंगलात सुरक्षा यंत्रणांनी तब्बल २९ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. नक्षलवाद्यांच्या जंगलातील तळावर घुसून मारण्याचा आक्रमक पवित्रा नक्षलविरोधी अभियानातील सुरक्षा यंत्रणांनी घेतला. त्याच्या धास्तीमुळे टप्प्यातील सर्वाधिक मतदान नक्षलग्रस्त भागातच झाले. हा योगायोग नाही. सर्वच सुरक्षा यंत्रणांनी आपसांतील समन्वयातून केलेल्या रणनीतीचा हा विजय आहे. देशभर निवडणुकीचा माहोल असतानाही सुरक्षा यंत्रणांनी बचावात्मक पवित्रा न घेता नक्षलवाद्यांच्या उरातधडकी भरवणाऱ्या कारवाया सुरु ठेवल्यानेच ३० एप्रिल रोजी अबुझमाड येथे १० नक्षलवाद्यांना यमसदनी पाठविले गेले, छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात १० मे रोजी १२ नक्षलवाद्यांचा खातमा केला व परवा भामरागडातील जंगलात तिघांना ठार केले. मार्च ते मे महिन्याच्या दरम्याननक्षलवादीढउजउ म्हणजेच टॅक्टिकल काउंटर ऑफेन्सिव्ह कॅम्पेन राबवून पोलिसांवर हल्ले करीत असतात. शत्रूच्या छोट्या-छोट्या तुकड्यांवर हल्ले चढवण्याची ही रणनीती असते. सुरक्षा यंत्रणांनी नेमकी अशीच भूमिका घेत नक्षलवाद्यांची कोंडी केली आहे.

महाराष्ट्र पोलिसांनी नक्षलवाद्यांच्या कोअर एरियामध्ये घुसून त्यांना जबर हादरा दिला आहे. छत्तीसगढ, तेलंगणा महाराष्ट्र राज्यातील पोलिस यंत्रणा, सी- ६० पथक, नक्षलविरोधी अभियानातील अनेकांच्या समन्वयाचे हे यश आहे. नक्षलवाद्यांना ग्रामस्थांकडून मिळणारी रसद तोडण्यासाठी राबविलेल्या योजनांचाही त्यात मोठा वाटा आहे.माओवादी चळवळीतून हिंसेकडे वळलेल्यांना सामान्य आयुष्य जगण्याची संधी देणारी आत्मसमर्पण योजना, पोलिस दादालोरा खिडकी, हक्काची घरे, एक गाव-एक वाचनालय, पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण अशा तब्बल २२ योजनांमधून नक्षलग्रस्त ग्रामस्थांना मुख्य प्रवाहात आणले जात आहे. तरुणांना हॉटेल मॅनेजमेंट, ऑटोमोबाइल, नर्सिंग, व्यवसाय विकास आणि इतर क्षेत्रांत व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे.उद्योग, पायाभूत सुविधांच्या उभारणीतून विकासाचे चक्र फिरत आहे. गेल्या साडेतीन वर्षांतनक्षलवादीचळवळीत नवीन भरती झालेली नाही. देशभरात नक्षलवाद्यांच्या दलमची संख्या १०० पर्यंत खाली आली आहे. त्यातही जेमतेम १० ते २० दलम सक्रिय असल्याचे सांगतात. कतरंगट्टा जंगलात मारल्या गेलेल्या तीन नक्षलवाद्यांसह गडचिरोलीतील पेरिमिली दलमही संपुष्टात आले आहे. नक्षली आता हातपाय मारतील, ग्रामस्थांसाठी फतवे काढतील, पण ग्रामस्थांसोबत असलेला पोलिसांचा 'कनेक्ट' नव्या विश्वासाचे अन् विकासाचेही पर्व ठरले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने राज्याच्या पोलिस यंत्रणांना विश्वास दिला, आधुनिक शस्त्रे दिली आणि समन्वयात कसर राहणार नाही, याची दक्षता घेतली. त्यामुळेच देशभरात गेल्या चार महिन्यांत आतापर्यंत सुमारे १०० हून अधिक माओवादी ठार, १३० पेक्षा जास्त पकडले गेले. यावरून सुरक्षा दलांची आक्रमकता लक्षात येते. याच कालावधीत १५० हून अधिक नक्षल्यांनी केलेले आत्मसमर्पण हा संवादाची दारे अजूनही उघडी असल्याचा संकेत आहे.

नक्षलवाद ही मध्यभारताला अशांत करणारी मोठी समस्या आहे तीचा बिमोड करण्यासाठी सुरक्षा यंत्रणा आक्रमक करतानाच या भागातील नागरिकांच्या कल्याणाचे सूत्र सरकारने हाती घेतले. आता भारतात नक्षल्यांची अखेर जवळ आली आहे, असे संकेत दिसतात!

# रस्त्याजवळ कचरा टाकल्याने आरोग्याची समस्या होणार निर्माण





**बाणेर, बालेवाडी :** महानगरपालीकाने कचरा रस्त्यावर टाकू नये म्हणून काही दिवस योजना राबवली होती कचरा रस्त्यावर टाकल्यास दंडात्मक कारवाई सुध्दा राबविली कचरा कोणीही रस्त्या जवळ टाकू नये असे सर्व क्षेत्रीय कार्यालयांना आदेश असतांनाही बाणेर, बालेवाडीत रस्त्या लगतच कचरा टाकण्याचा प्रकार उघड होत आहे

कचरा जास्त दिवस एकाच ठिकाणी साचल्यामुळे घाणीचे साम्राज्य आणि डासांची उत्पत्तीत वाढून आरोग्य समस्या जानवत आहे मनपाने यावर तातडीने पावले ऊचलून पाहणी करून संबंधीतावर कारवाईची मागणी होत आहे

बाणेर पॅन कार्ड क्लब हॉटेल रोडजवळ तसेच या भंगार पडलेल्या हॉटेलच्या ग्राऊन्ड मध्ये माती,दगड,कचरा ट्रक भरून आणून टाकण्यात येतो या विभागात अनेक बांधकाम सुरू आहे या बांधकाम व्यवसाईकावर कोणतेही बंधन नसल्या कारणाने हे कचरा आणून टाकतात कचरा साचलेला आहे म्हणून ईतर घरातील आणि दुकानातील कचरा सुध्दा येथे टाकला जातो कचरा अनेक दिवसा पासुन साचलेला असल्या कारणाने याची दुर्गंधी या विभागात पसरत आहे डासांचे प्रमाणात सुध्दा वाढ झाली आहे या कारणाने आरोग्य समस्या जानवत आहे या प्रकारा बाबत आरोग्य विभाग आणि घण कचरा विभागाची भेट घेतली असता यांची भेट होऊ शकली नाही दत्तमंदिर बाणेर रोड जवळ सुध्दा रोडजवळ अनेक ठिकाणी कचरा टाकण्यात येत आहे.

बालेवाडीतही अशीच परिस्थिती दसरा चौकातील एका शाळेजवळ कचरा टाकल्या जातो शाळे समोरील खाली जागेमध्ये

**येथिल बांधकाम करणारे माती ,दगड आणि कचरा पॅन कार्ड हॉटेलच्या खाली जागेत आणून टाकतात अनेक दिवसा पासुन हा कचरा साचला आहे याचा वास येऊन डासांचे प्रमाणात वाढ झाली आहे तर दूकानदारांचा आणि घरातील कचरा उचण्या करिता कचरा ऊचलणारे पैसे मागतात मग हे या कारणाने कचरा हा रोड जवळ टाकतात या विभागात कचरा रोज उचल्या जात नाही तक्रार करूनही याची दखल घेतली जात नाही**

**- अनिल धनकुडे बाणेर**

कचरा दुकानदार घरातील व्यक्ति कचरा आणून टाकतात यावर कोणाचेही बंधन नाही याबाबत अनेकांनी याबाबत तक्रारही करूनही कोणतीही कारवाई केली जात नाही

पूढे पावसाळा सुरू होणार असाच कचरा साचत राहल्यास या पुढे आरोग्य समस्या जास्त जाणवणार यावर महानगरपालीकेने तातडीने पावले ऊचलून कचरा ,माती,दगड टाकणारे बांधकाम व्यवसाईक आणि घरातील आणि दूकानातिल कचरा टाकणारेवर कारवाईची मागणी येथिल जनता करत आहे.

# येलवाडी परिसरात डासांचा उच्छाद शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग

**पिंपरी चिंचवड :** शहराचा बाढता विस्तार त्या तुलनेत न मिळणाऱ्या पायाभूत सुविधांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. नगर पालिकेत गेल्या दीड वर्षापासून प्रशासक राज सुरू असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्याकडे लोकप्रतिनिधींनीदेखील दुर्लक्ष केले असताना आता शहरात डासांच्या संख्येत वाढ झाली आहे. शहरातील दाट लोकवस्तीच्या भागात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून, गटारी तुंबत असल्याने डासांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, पालिका प्रशासनाच्या विरोधात नाराजी पसरली आहे.

शहरातील दाट लोकवस्तीच्या भागात अनेक ठिकाणी साचलेला कचरा आणि नियमित घंटागाडी येत.

नसल्यामुळे नागरिकांनी मोकळ्या भूखंडावर कचरा टाकण्याला सुरुवात केली आहे. तसेच गटारींची नियिमित स्वच्छता होत नसून शहरात जतुंनाशक औषधांची फवारणी देखील होत नाही. त्यामुळे शहरात डासांचे प्रमाण वाढले आहे. सायंकाळी सातच्या आत घरात या म्हणीप्रमाणे नागरिकांनी सायंकाळनंतर दरवाजा उघडणे मुश्किल झाले आहे. गल्लीबोळात, चौकाचौकात देखील डासांनी थैमान

येलवाडी ग्रामपंचायत नियमित धूर फवारणी करणे गरजेचे आहे. वाढत्या डासांच्या प्रमाणामुळे लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्या जाणवत आहेत. मोकळ्या गटारी असल्यामुळे ही समस्या सर्वाधिक जाणवत असून पालिकेने स्वच्छता मोहीम राबविली पाहीजे असे नागरिक बोलत आहे.

घातल्यामुळे नागरिकांनी प्रचंड प्रमाणात संताप व्यक्त केला आहे. वाढत्या डासांच्या प्रमाणामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान बालके यांच्या रुग्णसंख्येत काही प्रमाणात वाढ झाली आहे. येलवाडी ग्रामपंचायत लक्ष देण्याची गरज आहे

# आळंदी मंदिरात मोहिनी एकादशी साजरी

## मंदिरात लक्षवेधी पुष्पसजावट; दर्शनास गर्दी

**पिंपरी चिंचवड :** येथील माऊली मंदिरात मोहिनी एकादशी धार्मिक परंपरेने पवमान अभिषेख, नित्यउपचार पूजाविधा, महानैवेद्य, धुपारती आदी कार्यक्रमानी मोहिनी एकादशी आळंदीत साजरी करण्यात आली. मोहिनी एकादशीचा दुर्मिळ योग भाविकांना लाभला. मोहिनी एकादशीचे उपवासाचा परिणाम जवळ जवळ संपूर्ण जीवनात एकादशी केल्याच फळ प्राप्त होते असा असल्याची भावना वारकरी संप्रदायात असल्याने या एकादशीला खूप महत्त्व आहे. आळंदी मंदिरात गाभारा आकर्षक पुष्पसजावटीने सजविण्यात आला होता. आळंदी देवस्थानने भाविकांना पिण्याचे पाणी वाटपाचे दर्शन बारीक थेट नियोजन केल्याने भाविकांची सोय झाली.

मोहिनी एकादशी पर्वकाळ रविवारी ( दि १९ ) एकादशी केल्यास आयुष्यभर एकादशी केलेचे पुण्य अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. मोहिनी एकादशी आळंदी, देहु पंचक्रोशीत धार्मिक महत्त्व ओळखून साजरी झाली. या एकादशीला वारकरी संप्रदायात फार मोठे महत्व आहे.

त्याच प्रमाणे हरिनाम गजरात एकादशी



साजरी करण्यात आली. या निमित्त विश्वस्त योगी निरंजननाथजी, व्यवस्थापक माऊली वीर , सेवक कर्मचारी यांनी नियोजन केले. मंदिरातील श्रींचा गाभारा लक्षवेधी फुलांनी सजविण्यात आला होता. आळंदीत एकादशी दिनी अन्नदान फराळाचे वाटप उत्साहात करण्यात आले.

एकादशी दिनी सायंकाळी काहीवेळ जोरदार पाऊस आल्याने नागरिक, व्यापारी, भाविकांनी मिळेल त्या ठिकाणी थांबून निवारा गाठला.

जोरदार पावसाने हजेरी लावल्याने पावसाचे कालावधीत आळंदीतील विविध रस्त्यावर पावसाचे पाण्याची डबकी साचून वाहिली. दिव्यांग बांधवानी आयोजित केलेल्या ज्ञानेश्वरी परायणाची हरिनाम गजरात सांगता झाली. यावेळी समाजरत्न नानजीभाई ठक्कर यांनी मार्गदर्शन करीत संवाद साधला.

गेल्या दोन वर्षा पासून हे पारायण सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. आळंदी देवताशांचे सहकार्याने या पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान पावसाचा जोर वाढल्याने काही तास विद्युत पुरवठा खंडित झाल्याने सर्वत्रच भाविक, नागरिकांची गैरसोय झाली. आळंदी नगरपरिषदेने पावसाळी कामात रस्त्यावरून वाहणारे पाणी नाली, ड्रेनेज मधून कसे वाहील. या बाबातचे नियोजन करण्याची मागणी आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी केली आहे.


# पुण्यात समाधी स्थळाचा होतोय गोठा

## समाधी वारसा जपण्यासाठी पुणेकरांना आणि पालिकेला आवाहन

**पुणे :** ओंकारेश्वर मंदिरामागे भिंती जवळ नदीपात्रात असलेली कै.गंगाधर केळकर यांच्या समाधीला, समाधी वास्तू उभारणीचा अप्रतिम नमुना असलेल्या १९२८ सालच्या समाधीजवळ गुरे बांधून या परिसराचे गोठ्यासारखा वापर सुरु असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे . समाधी स्थळाचे रूपांतर करून मूळ रूप आणि भावना बदलू नये असे आवाहन केळकर कुटुंबीयांनी पुणेकरांना आणि पालिकेला केले आहे.

स्थानिक परिसरातील काही जण समाधीच्या शेडमध्ये गुरे बांधून त्यांच्या चारा-पाण्याच्या सोयीसह वापर करून समाधी परिसराचा गोठा करीत असल्याचे केळकर कुटुंबियांच्या निदर्शनास आले. हे पाहून गंगाधर केळकर यांचे नातू नेत्ररोगतज्ज्ञ डॉ .श्रीकांत केळकर आणि कुटुंबीयांनी या समाधीला भेट देऊन पाहणी केली. आणि गोठ्यासारखा वापर होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. महापालिकेने संबंधितांवर कारवाई केली पाहिजे,असे त्यांनी सांगितले.अनेकदा संरक्षित करून ,रेलिंग आणि कठडे उभारून देखील हे प्रकार थांबत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

समाधी वास्तू उभारणीचा अप्रतिम नमुना असलेली ही रचना केळकर संग्रहालयाचे संस्थापक दिनकर केळकर आणि त्यांचे बंधू भास्कर केळकर यांच्या कलाप्रेमाचा नमुनाही आहे. गंगाधर या शब्दाचा अर्थ शंकर असा असल्याने उभारणीच्या वेळेसच समाधीवर कलात्मकरीत्या पिंड(शिवलींग) बसवलेले आहे.पानशेतच्या पुरातून वाचलेली समाधी अजून येणाऱ्या जाणाऱ्या चे लक्ष वेधून घेते .समाधीच्या मूळ स्वरूपाची जुनी छायाचित्रेही केळकर कुटुंबीयांकडे आहेत. समाधीचा वारसा जपण्याचे आवाहन त्यांनी नागरिक आणि पुणे पालिकेला केले आहे .



### ※केळकर समाधी विषयी※

**श्री अष्टभुजा दुर्गा मंदिराशेजारच्या मुठेकाठच्या रस्त्याने आपण ओंकारेश्वराच्या पुढे असलेल्या दशक्रिया विधी करायच्या घाटाजवळ आलो की,रस्त्याच्या पातळीवर थोडं पुढे उजवीकडे एका खोलगट हौदासारख्या भागात ※गंगाधर केळकर※ यांचे अतिशय देखणे स्मारक आहे. पुण्यातील प्रख्यात नेत्रशल्यतज्ज्ञ डॉ. केळकर आणि कवी अज्ञातवासी म्हणजे राजा केळकर संग्रहालयाचे संस्थापक दि.गं. केळकर यांचे श्री. गंगाधर केळकर हे पूर्वज आहेत.मध्यभागी असणाऱ्या चौकोनी चौथऱ्यावार दोन टप्प्यांत असलेला अष्टकोनी चौथरा आणि त्यावर एक शिवपिंडी आणि या मध्यवर्ती स्मारक स्तंभाच्या बाजूंवर ओंकार चिन्हे व संगमरवरी माहिती फलक आहेत. या मुख्य स्तंभाच्या चारही बाजूंना कमी उंचीचे चार चौकोनी स्तंभ आहेत. त्यांवर काही देवदेवतांची शिल्पे कोरलेली आहेत. या स्मारकातील मध्यवर्ती स्तंभाच्या चारही दिशांना खालच्या टप्प्यात आणि चारही उपदिशांना वरच्या टप्प्यात संगमरवरी पाट्यांवर मजकूर लिहिलेला आहे.**

**कै.गंगाधर केळकर यांच्याविषयी**

कै.गंगाधर केळकर हे राजा दिनकर केळकर संग्रहालयाचे संस्थापक दिनकर केळकर यांचे पिता होते. त्यांच्या विषयी डॉ. श्रीकांत केळकर यांनी सांगितले की. 'माझे आजोबा कै. गंगाधर केळकर हे अत्यंत समाजहितदक्ष होते. त्यांनी पोस्टात नोकरी केली. निवृत्तीनंतर ते पुण्यात आले. त्या वेळी त्यांनी आता जेथे केळकर वस्तुसंग्रहालय आहे, ती जागा तेव्हा विकत घेतली. तेथे आधी आमचे घर होते, नंतर दिनकर केळकर (कवी अज्ञातवासी) यांनी संग्रहालय उभारले. त्याआधी गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण व्हावे यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांना खूप कळकळ होती. ते सर्वतोपरी विद्यार्थ्यांना मदत करीत असत. आपल्या संपत्तीतला काही भाग विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खर्च व्हावा, अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. त्यामुळे आमच्याकडे अनेक विद्यार्थी राहायला असत. माझ्या काकांच्या काव्यसंग्रहाला भा. रा. तांबेंनी प्रस्तावना दिली आहे. त्यात त्यांनी आमच्या काकांच्या काव्यज्ञानावर भाष्य केले आहे. प्रचंड विद्वत्ता असूनही ते अत्यंत साधेपणाने जगले. त्यामुळे आज त्यांच्या समाधीस्थळी अशा पद्धतीने काही नवीन अतिक्रमण होणे, हे चुकीचे वाटते.'

उत्तरेकडे,'।।श्री ।। तीर्थस्वरूप गंगाधर रघुनाथ केळकर यांचे पुण्यस्मरणार्थ'असा मजकूर आहे. पश्चिमेकडे,'जन्मतिथि शनिवार फाल्गुन शु. ५ शके १७७६ ता. ४ मार्च १८५४'असा मजकूर आहे.

पूर्वेकडे,'देहावसान स्वगृही पुणे सोमवार नागपंचमी निजश्रावण शु. ५ शके १८५० ता. २० ऑगस्ट १९४८'असा मजकूर आहे.दक्षिणेस,'वास्तव्य शांतिकुंज जाईचे गेटाजवळ सदाशिव पेठ पुणे शहर'असा मजकूर आहे.

# कृष्णाथ उर्फ दादासाहेब चोरमले यांची महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या प्रसिद्धी समितीच्या सदस्यपदी निवड

**फलटण :** पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनच्या बैठकीत विविध समित्यांच्या निवडी नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने प्रसिद्धी समितीच्या सदस्यपदी 'आस्था टाईम्स'चे कार्यकारी संपादक तथा राष्ट्रीय खो-खो खेळाडू कृष्णात उर्फ दादासाहेब चोरले यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली.

पुणे येथे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यामध्ये विविध समित्या व त्यांचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांच्या निवडी महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी जाहीर केल्या.

यामध्ये प्रसिद्धी समितीच्या अध्यक्षपदी अजित संगवे तर सचिवपदी राजेश कळंबटे यांची निवड करण्यात आली



असून सदस्यपदी दादासाहेब चोरमले, भूषण कदम, महेश विचारे, संदीप बल्लाळ, प्रेमचंद चौधरी व गणेश माळवे यांची निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल विधान परिषदेचे माजी सभापती तथा आमदार श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, आमदार दीपक चव्हाण, फलटण तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा आदी मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# एटीएम जिलेटीनने फोडण्याच्या तयारीत असणारी पाचजणांची टोळी जेरबंद

**सातारा :** उंब्रज व तळबीड पोलिसांनी मसूर (ता. कराड) येथील एटीएम जिलेटीनने फोडण्याच्या तयारीत असणाऱ्या पाच जणांच्या टोळीला शिवडे (ता. कराड) गावच्या हद्दीत कृष्णा नदीच्या पुलानजीक सापळा रचून पकडले. या टोळीमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे.

वैभव राजेंद्र साळुंखे (वय ३३), ओमकार बाळासाहेब साळुंखे (वय २३), आदित्य संतोष जाधव (वय १९, सर्व रा. मोळाचा ओढा, सातारा) व एक अल्पवयीन असून अन्य एक जण पळून गेला आहे.

याबाबत उंब्रज पोलिसांनी दिलेली माहिती अशी, गुरुवारी रात्री तळबीड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किरण भोसले हे रात्रगस्तसाठी जाताना शिवडे गावच्या हद्दीत कृष्णा नदीच्या पुलाजवळ पाचजण संशयितपणे आढळून आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# राजू शेट्टी यांची साखर आयुक्तांकडे मागणी

## यंदाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ऊसाला एफआरपी पेक्षा जादा रक्कमेला मंजूरी देण्याबाबत कारखान्यांना लेखी आदेश द्यावेत

**कोल्हापूर :** गेल्या दोन वर्षापासून साखरेसह उपपदार्थांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारात चांगला दर मिळाला असून यामुळे साखर कारखान्यांकडे उसाच्या एफ.आरपीची रक्कम अदा करून पैसे शिल्लक राहिले आहेत. या पैशावरती शेतक-यांचा अधिकार असल्याने राज्यातील सर्व पक्षाचे साखर कारखानदार एक होवून या पैशावरती डल्ला मारण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे गतवर्षी हंगामात झालेली चूक कारखानदारांनी न करता यावर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेवर विषय घेऊन एफआरपी पेक्षा जादा रक्कमेला मंजूरी देण्याबाबत कारखान्यांना लेखी आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त कुणाल खेमणार यांच्याकडे शनिवारी लेखी पत्राद्वारे केली आहे.



गेल्या दोन वर्षापासून केंद्र सरकारच्या धोरणामुळे देशातील साखर कारखान्यांनी उसापासून इथेनॉल निर्मिती करण्यास प्राधान्य दिले. यामुळे साखर, इथेनॉल , बगॅस, को-जन, स्पिरीट , अल्कोहोल, मळी यासह इतर उपपदार्थांना चांगला दर मिळाला आहे. यामुळे साखर कारखान्यांकडे उत्पादन खर्च वजा जाता पैसे शिल्लक राहू लागले आहेत.गतवर्षी राज्यातील सोमेश्वर, माळेगांव, विघ्नहर , भीमाशंकर या कारखान्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत एफ. आर. पी पेक्षा जादा रक्कमेस मंजूरी घेऊन शेतक-यांना त्यांच्या हक्काचे जादा पैसे दिले.

मात्र याप्रमाणे राज्यातील इतर कारखान्यांनी मखलाशी करत वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव नसल्याचे कारण दाखवित शासनाकडे बोट दाखवून सर्वपक्षीय कारखानदार एकजूट करून या पैशावर डल्ला मारण्याचा प्रयत्न करत आहेत.

यामुळे चालू हंगामातील साखर व उपपदार्थाच्या जादा उत्पन्नातील आलेले पैसे शेतक-यांना मिळण्यासाठी आताच साखर आयुक्तांनी सर्व कारखान्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेवर विषय घेऊन या विषयास मंजूरी घेण्याबाबत लेखी आदेश काढून कळविण्याबाबतची मागणी केली. यामुळे राज्यातील सर्व

कारखान्यांना लेखी आदेश करून या विषयास साखर कारखान्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभामध्ये हा शेतकरी हिताचा निर्णय झाल्यास याचा ऊस उत्पादक शेतक-यांना लाभ होणार आहे.

# नाशिक मतदारसंघात ओबीसींची मते महत्त्वाची

**नाशिक :** नाशिक लोकसभा मतदारसंघात मागील तीन निवडणुकांत प्रमुख राजकीय पक्षांच्या मराठा-ओबीसी समाजातील उमेदवारांमध्ये थेट अटीतटीची लढत झाली होती. यावेळी पक्षांनी ओबीसीऐवजी मराठा उमेदवाराला प्राधान्य दिल्यामुळे या जागेवर मराठा-ओबीसी असा थेट संघर्ष टळून उलट ओबीसी समाजाची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

महायुतीतील जागा वाटपातील घोळामुळे ओबीसी नेते छगन भुजबळ यांना महिनाभराच्या प्रतीक्षेनंतर उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. शिवसेना शिंदे गटाने खासदार हेमंत गोडसे या मराठा समाजातील उमेदवाराला पुन्हा संधी दिली. महाविकास आघाडीचे राजाभाऊ वाजे आणि वंचित बहुजन आघाडीचे करण गायकर हे दोघेही मराठा समाजाचे उमेदवार रिंगणात आहेत. २००९ ते २०१९ दरम्यानच्या तीन निवडणुकीत नाशिकच्या जागेवर मराठा-ओबीसी समाजातील उमेदवारांमध्ये मुख्य लढत झाली होती. एकदा ओबीसी तर, दोन वेळा मराठा समाजातील उमेदवाराने विजय मिळविल्याचा इतिहास आहे. यंदा उमेदवारीच्या स्पर्धेतून भुजबळांना डावलल्याने ओबीसी समाजाची नाराजी यापूर्वीच उघड झाली होती. प्रमुख पक्षांकडून ओबीसी उमेदवार रिंगणात नसल्याने या समाजाची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघात मराठा आणि ओबीसी समाजातील मतदारांमध्ये ५० ते ७० हजारांचा फरक असल्याचा अंदाज आहे. उभयतांमध्ये प्रदीर्घ काळापासून राजकीय वर्चस्वाची स्पर्धा आहे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत एकसंध राष्ट्रवादीचे समीर भुजबळ यांनी मनसेचे हेमंत गोडसे यांना पराभूत केले होते. त्यावेळी मनसेचे गोडसे आणि एकसंध शिवसेनेचे दत्ता गायकवाड हे दोन मराठा उमेदवार रिंगणात होते. मतविभागणीमुळे ओबीसी समाजातील उमेदवाराचा विजय सुकर झाल्याचे मानले गेले.

सामाजिक अभ्यासक संदीप डोळस यांनी आरक्षणावरून राज्यात मराठा-ओबीसी वादामुळे निर्माण झालेल्या स्थितीवर बोट ठेवत नाशिक लोकसभेतील जातीय समीकरण मांडले. मतदारसंघात मराठ्यांच्या खालोखाल ओबीसी समाज आहे. रिंगणात प्रमुख उमेदवार मराठा समाजाचे असल्याने मतांचे विभाजन होईल. त्यामुळे ओबीसी मतदारांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले.

जातीय समीकरण

नाशिक लोकसभा मतदारसंघात २० लाख ३० हजार १२४ मतदार आहेत. यामध्ये सहा लाखाच्या आसपास मराठा तर, साडेपाच लाख ओबीसी मतदार असल्याचा अंदाज आहे. आदिवासी पावणे तीन लाख तर, दलित आणि मुस्लीम समाजातील प्रत्येकी दोन लाख आणि उच्चवर्णीय समाजातील दीड लाखाच्या आसपास मतदार आहेत.

# अकोला जिल्ह्यात वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस



**अकोला :** जिल्ह्यात शनिवारी जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस झाला तर काही गावात गारपीट झाली. यामध्ये घर, जनावरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गत दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण असल्याने पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली होती. त्यानुसार, सायंकाळच्या सुमारास अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. जिल्ह्यातील अकोट, तेल्हारा तालुक्यात जोरदार पाऊस झाला. अकोटात चांगला पाऊस बरसल्याने सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे काही भागात वाहतूक ठप्प झाली होती. सकाळी प्रखर ऊन तापल्यानंतर दुपारी अचानक वातावरणात बदल झाला व जोरदार वादळ आले. धुळीचे लोट उडाले, मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. वादळात काही घरावरील टिनपत्रे उडाली. अकोट तालुक्यातील अनेक गावात गारपीटचा तडाखा बसला. ग्रामीण व शहरी भागात आकाशात टीनपत्रे उडून जाताना दिसून येत होते. या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे व गोरगरिबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तेल्हारा तालुक्यात ज्वारी पिकाची नासाडी

तेल्हारा तालुक्यात मागील आठवड्यापासून तीन वेळा वादळ वाऱ्यासह पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. शनिवारी सायंकाळच्या सुमारास पुन्हा वादळवाऱ्यासह पावसाने चांगलेच नुकसान झाले. तालुक्यातील वरुड बिहाडे, राणेगाव भोकर परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीने ज्वारी पिकाचे नुकसान झाले.

रुईखेड परिसरात केळी पिकांचे नुकसान

अकोट तालुक्यातील रुईखेड परिसरात वादळी वाऱ्यामुळे केळी पिकाचे अतोनात नुकसान झाले. उभी केळी पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.

वरूर जऊळका येथे तासभर पाऊस

वरूर जऊळका : खारपाणपट्ट्यातील वरूर जऊळका येथे १८ मे रोजी दुपारी विजेच्या कडकडाटात वादळवाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. सतत तासभर रिमझिम पाऊस सुरू होता. शनिवारी गावातील बाजार असल्याने अचानक आलेल्या पावसामुळे विक्रेते, ग्राहकांची तारांबळ उडाली होती. तसेच नेहमीप्रमाणे विद्युत पुरवठा खंडित झाला होता. सावरा विद्युत केंद्राअंतर्गत येणाऱ्या या गावांमध्ये थोडा फारही पाऊस आला तर विद्युत पुरवठा बंद पडतो. त्यामुळे ग्रामस्थांना अडचणीचा सामना करावा लागतो.



# आषाढी यात्रेसाठी ७ जुलैपासून १८ दिवस घेता येणार विठ्ठलाचे २४ तास दर्शन

## मंदिर प्रशासनाचा निर्णय

सोलापूर : १७ जुलै २०२४ रोजीआषाढी एकादशीसोहळा होत आहे. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या यात्रेला भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन ७ ते २४ जुलै दरम्यान विठ्ठल-रुक्मिणी मातेचे २४ तास दर्शन सुरू करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.यावेळी शेळके म्हणाले, येणाऱ्या भाविकांना सुलभ व तत्काळ दर्शन व्हावे, यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून आवश्यक ते नियोजन करण्यात आले आहे. दर्शन रांग, पत्रा शेड, दर्शन मंडप येथे भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. यासाठी २ हजार कर्मचारी, स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे.यावेळी दर्शनरांग व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, यात्रेतील प्रथा व परंपरा, सुरक्षा व्यवस्था, दर्शन रांगेतील अन्नदान, वैद्यकीय व्यवस्थेचे स्टॉल, स्वच्छता व्यवस्था, शासकीय महापूजा, लाइव्ह दर्शन व्यवस्था, देणगी व्यवस्था, निवास व्यवस्था, अपघात विमा पॉलिसी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सीसीटीव्ही व वायरलेस यंत्रणा, लाडू प्रसाद व्यवस्था, महिलांसाठी चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष व विश्रांती कक्ष आदी व्यवस्थेचा आढावा घेऊन आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजनाचा आढावा घेऊन भाविकांना अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनास केल्याची माहिती त्यांनी दिली.

# ॲड.अभय छाजेड यांची ओरिसात निरीक्षकपदी नेमणूक

राजदंड न्यूज नेटवर्क



**पुणे :** ओरिसामधील बालासोर लोकसभा मतदार संघासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. अभय छाजेड यांची अ. भा. काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक निरीक्षकपदी नेमणूक करण्यात आली आहे. ओरिसामध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाचवेळी होत असून बालासोर मतदार संघात ७ विधानसभा मतदार संघ आहेत. माजी केंद्रीयमंत्री श्रीकांत जेना हे काँग्रेस पक्षाचे तेथे उमेदवार आहेत. बालासोर लोकसभा मतदार संघात अखेरच्या टप्प्यात १ जून रोजी मतदान होणार आहे. पुणे लोकसभा मतदार संघातील जबाबदारी संपवून ॲड.अभय छाजेड ओरिसातील बालासोर येथे रवाना झाले.

# सहायक निबंधक कार्यालयात सुरु असलेल्या अनागोंदी कारभार व आर्थिक लुटीची चौकशी व्हावी

**शिरोळ :** शिरोळ येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील अनागोंदी कारभार व नियमबाह्य तुकडे बंदी खरेदी पत्रे याबाबतची जिल्हाधिकारी कार्यालयाने गंभीर दखल घेतली असून जिल्हा पोलीस प्रमुख व जिल्हा निबंधक यांना शिरोळ येथील सहायक निबंधक कार्यालयात सुरू असलेल्या अनागोंदी कारभार व आर्थिक लुटीची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी अशा सूचना दिल्याने शिरोळ तालुक्यात खळबळ उडाली असून शिरोळ येथील सहाय्यक निबंधक कार्यालय लवकरच चौकशीच्या फेऱ्यात अडकणार अशी शक्यता आत्तापासूनच दिसून येत आहे याबाबतची तक्रार सुनील बळवंत कुरुंदवाडे यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे केली होती

याबाबत अधिक माहिती अशी की शिरोळ येथील सहाय्यक निबंध कार्यालय खरेदी पत्राच्या झेरॉक्स प्रति व इंडेक्स उताऱ्या करता शासकीय नियम डावलून वारे माप फी वसूल करते शिवाय २०२१ पासून तुकडेबंदी खरेदीपत्र करण्यास बंदी असताना देखील या कार्यालयात अशा प्रकारची खरेदीपत्रे होतात अशा मुद्द्याद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुनील कुरुंदवाडे यांनी या अनागोंदी कारभाराविरुद्ध ध जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल केली होती या तक्रारीची दखल घेऊन अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली यांनी जिल्हा उपनिबंधक कोल्हापूर पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांना पत्रे पाठवून पुढील कारवाई करण्याच्या सूचना पत्रात देण्यात आले आहेत.

या कार्यालयातील अनागोंदी कारभार व नियमबाह्य फी वसुली बाबत प्राथमिक स्वरूपाची जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल केली आहे.

# शिक्षणाचा पाया म्हणून कलाशिक्षणाकडे पाहिले पाहिजे : कुलगुरु डॉ. राजनीश कामत

**मुंबई :** निसर्ग हा माणसाचा गुरू आहे, कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी क्रिया आहे. या हेतूने शिक्षणाचा पाया म्हणून कलाशिक्षणाकडे पाहिले पाहिजे. असे मत कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांनी मुंबई जहांगीर आर्ट गॅलरीत मल्लिकार्जुन सिंदगी यांच्या होरायझन चित्रप्रदर्शन उदघाटन प्रसंगी व्यक्त केले.

मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुलांना कला निर्मितीसाठी मुक्ताविष्काराची तसेच नवनवीन विशेषतः आर्टिफिशल इंटेलिजन्स, डाटा सायन्स फॉर डायव्हर्सिटी आदी अभ्यासक्रमाचे शिक्षण देते.

या विद्यापीठातील पांच कोर्सेस विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर घेऊन जाणार आहेत. यापुढे रुचिसंपन्न रसिक व सौंदर्यदृष्टी असलेले प्रतिभावान विद्यार्थी या शिक्षणातून यापुढे तयार होणार असून स्वतंत्र प्रतिभेचा आविष्कार हाच समाज आणि राष्ट्र घडवणारी शक्ती निर्माण करणार आहे. असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजनीश कामत यांनी केले.

संगणकाची इंजिने कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे कलाकृती तयार करतात. तथापि, त्यापैकी सर्व किंवा बहुतेक आता प्रायोगिक आहेत आणि ते नजीकच्या भविष्यात कसे बाहेर येईल हे आशादायक दिसते आहे. जरी हे तंत्रज्ञान अद्याप त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात आहे, तरीही शक्यता अनंत आहेत. तरुणांनी याचा अवलंब करून आपल्यातला कलाकार बाहेर काढला पाहिजे असे त्यांनी सांगितले . कलाशिक्षक मुकुंद वेताळ यांनी प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन केले.

# चांदोलीतील अधिवास सोडून गवे वारणावती वसाहतीत मुक्कामाला

## गव्यांचे कळप नागरी भागात

**वारणावती :** मणदूर, ता. शिराळा परिसरात गव्यांच्या कळपाने ग्रामस्थांची झोप उडवली आहे. सध्या परिसरात खरीप हंगामातील शेती कामांची लगबग सुरु झाली आहे. शेतकरी रानामाळात काम करण्यात व्यस्त आहेत. गव्यांचे कळप मानवी वस्तीत शिरकाव करत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.शिराळा तालुक्याच्या पश्चिम विभागात गव्यांचा मानवी वस्तीतील वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वारणावती वसाहतीत निर्मनुष्य झालेल्या पडक्या खोल्या व बाजूलाच असणाऱ्या ऊसाच्या फडात गव्यांनी तळ ठोकल्याचे बऱ्याच महिन्यांपासून गावकऱ्यांच्या निदर्शनास येत आहे. काही ग्रामस्थांनी कळपाला त्यांच्या नैसर्गिक अधिवासात परत घालवण्यासाठी प्रयत्न केले होते, परंतु ते अयशस्वी ठरले. शनिवारी (दि.१८) सकाळी राम पाटील, शरद पाटील, अशोक सोनार, आनंदा बागडे, एन. के. कांबळे हे ग्रामस्थ फिरायला गेले असता एकाच वेळी अंदाजे १५ ते १६ सोळा गव्यांचा कळप नदीकडील बाजूने जुन्या आश्रमशाळेजवळून डोंगराच्या दिशेने जाताना दिसला. यामुळे सकाळी फिरायला जाणाऱ्या ग्रामस्थांत घबराट निर्माण झाली आहे.

गव्यांनी परिसरातील ऊसासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. त्याचबरोबर गव्यांचा मुक्तसंचार ग्रामस्थांच्या जीवावरही बेतल्याच्या घटना घडल्या आहेत. वन विभागाने गव्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.गवे किती आणि कोठे थांबले आहेत? वारणावती वसाहतीमध्ये सध्या



वापराविना बंद अवस्थेत पडून असलेल्या रिकाम्या खोल्या आणि बाजुने वाढलेली काटेरी झुडपे तसेच शिवारातील ऊसाची शेती यामध्ये वन्य प्राण्यांनी नवीन अधिवास तयार केला आहे. पाणी पिण्यासाठी जवळच वारणा नदी असल्याने अन्न व पाण्याच्या शोधात गवे व अन्य प्राणी नागरी वसाहतीत येत आहेत. गव्यानी चांदोली राष्ट्रीय उद्यानातील आपला मूळचा अधिवास सोडून मानवी वस्तीकडे मोर्चा वळवला आहे.

# राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे कृषी विभागाचे उद्दिष्ट : कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

राजदंड न्यूज नेटवर्क

**पुणे :** नैसर्गिक शेतीतील उत्पादने ही नागरिकांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असून राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे कृषी विभागाचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.

कृषी व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक शेतीबाबत विज्ञान आणि नैसर्गिक शेती या विषयावरील यशदा येथे आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषी व शेतकरी विभाग भारत सरकार व एकात्मिक पोषण व्यवस्थापनच्या उपसचिव रचना कुमार, सहसचिव डॉ. योगीता राणा, आयसीएआरचे सहायक महासंचालक एस. के. शर्मा, डॉ. राजबीर सिंग, कृषी संचालक (आत्मा) दशरथ तांभाळे, पद्मश्री संजय पाटील, देशाच्या पश्चिम भागातील राज्यांचे कृषी सचिव, आयुक्त, संचालक, आयसीएआरचे शास्त्रज्ञ, शेतकरी आदी उपस्थित होते.

डॉ. गेडाम म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनअंतर्गत राज्यातील किमान २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक शेतीचे धोरण अंमलबजावणीकरीता लोकप्रतिनिधींचेही सहकार्य घेण्याचा प्रयत्न आहे. नैसर्गिक शेतीचे फायदे, पाण्याचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेतीतील उत्पादनाला बाजारपेठ याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडून देशात नैसर्गिक शेती करण्याविषयी धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत असून राज्यातही ते धोरण अवलंबिण्यात येत आहे. नैसर्गिक शेती संदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना मराठी भाषेत भाषांतर करण्यात येतील. परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत नैसर्गिक शेतीकडे वळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

शेतकरी हा नैसर्गिक शेतीमागील मुख्य भागधारक असून तो आपल्या कुटुंबासाठी आणि उत्पन्नासाठी शेती करत असतो. रसायनांचा वापर न करता वनस्पती आणि प्राण्यांचे संवर्धन करण्यासाठी स्थानिक विविधतांवर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती करावी. महाराष्ट्रात सेंद्रिय कर्बयुक्त मातीचे प्रमाण खूपच कमी आहे. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी शेतकऱ्याबरोबर कृषी विभागानेही प्रयत्न करावेत, असे सांगून राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र रसायनमुक्त आणि विज्ञानयुक्त अशा नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे असेही डॉ.गेडाम म्हणाले.

श्रीमती रचना कुमार म्हणाल्या, भारत सरकारचा कृषी व शेतकरी कल्याण विभाग नैसर्गिक शेतीबाबतचे धोरण आणि त्याअनुषंगाने परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत कार्यक्रम सर्व राज्यात राबवित आहे. शेतकऱ्याला सेंद्रिय शेतीचे शास्त्रोक्त ज्ञान मिळायला हवे. नैसर्गिक शेती ही केवळ शेती नाही तर ते एक शास्त्रोक्त तत्त्वज्ञान आहे. याचा अवलंब करणे आवश्यक आहे.

रासायनिक शेतीचे दुष्परिणाम रोखण्यासाठी शास्त्रोक्त नैसर्गिक शेती का करावी याचे ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. या कार्यशाळेत देशातील विविध ठिकाणाहून आलेल्या अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळणार आहे. कार्यशाळेत भेटलेल्या ज्ञानाचा अवलंब करा, प्रत्यक्षात कृती करा असे सांगून नैसर्गिक शेतीला प्राध्यान्य देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यशाळेत श्रीमती राणा यांनी सादरीकरणाद्वारे नैसर्गिक शेतीची माहिती सांगितली.

# वडगावात अनधिकृत होल्डिंगवर कारवाईचा बडगा

वडगाव नगरपंचायत प्रशासनाकडून होल्डिंगची पाहणी; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा मुख्याधिकाऱ्यांचा इशारा

**वडगाव मावळ :** घाटकोपर मुंबई येथे घडलेल्या होर्डिंग कोसळण्याच्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून, वडगाव नगरपंचायत कार्यक्षेत्रातील अधिकृत/अनधिकृत होर्डिंग, उंच लोखंडी मनोरे, उंच लोखंडी ढाचे इत्यादीची नगरपंचायत प्रशासक मुख्याधिकारी मुख्य डॉ. प्रवीण निकम यांनी सहाय्यक नगरचनाकर व इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली.

वडगाव नगरपंचायत कार्यक्षेत्रात असणारे तसेच, रस्ते विकास महामंडळाच्या जुन्या पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत एकूण १२, तळेगाव-उर्से रस्त्याच्या लगत ४, व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या रस्त्याच्या हद्दीत ९ असे एकूण छोटे मोठे पंचवीस होर्डिंग शहरात सध्या अस्तित्वात आहेत.

नगरपंचायत मार्फत सर्व होर्डिंग मालकांना नोटीस देऊन सात दिवसाच्या आत नवीन स्ट्रक्चरल ऑडिट करून अहवाल न. प. कार्यालयास सादर करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अनधिकृत होर्डिंग धारकांनी विहित नमुन्यात परवानगी घ्यावी अन्यथा अनधिकृत होर्डिंग तात्काळ काढण्यात यावे व तसेच रस्ते विकास महामंडळाच्या हद्दीत असणाऱ्या होर्डिंगधारकांनी सदर कार्यालयाकडून परवानगी घेतली असल्यास त्यांची एक प्रत व संरचनात्मक तपासणी अहवालाची एक प्रत नगरपंचायत कार्यालयात जमा करावी.

अन्यथा शहरातील सर्व अनाधिकृत होर्डिंग नगरपंचायत मार्फत काढून टाकण्यात येईल व येणारा खर्च होर्डिंग धारकांकडून वसूल करण्यात येईल, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वर फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाही करण्यात येईल तसेच यापूर्वी नगरपंचायत मार्फत लेखी व तोंडी स्वरूपात शहरातील होर्डिंग धारकांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत, मागील वर्षी राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीतील होर्डिंग्स हटवण्यात आले होते, त्याचप्रमाणे सोमवारपासून रस्ते विकास महामंडळ व नगरपंचायत यांच्या मार्फत संयुक्त रित्या शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग्स काढण्यात येणार आहेत. अशा प्रकारच्या सूचना नगरपंचायत प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ.प्रवीण निकम यांनी दिल्या आहेत

## क्राईम

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी युवकावर गुन्हा

**सातारा :** महिलेस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी एका युवकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरात वास्तव्यास असलेल्या एका महिलेसोबत महेंद्र प्रकाश गोसावी रा. व्यंकटपुरा पेठ, सातारा याने प्रेमाचे नाटक करून तसेच तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याबरोबर लग्न न करता तिला नकार देऊन त्याचबरोबर तिला शिवीगाळ व हाताने मारहाण करून दमदाटी केली. यामुळे संबंधित महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जगदाळे करीत आहेत.

### मारहाण प्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** एकास मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १६ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास लकडी पूल, बुधवार पेठ, सातारा येथे आयान शकील मुजावर रा. लकडी पूल, बुधवार पेठ, सातारा याला लोखंडी रॉड ने मारहाण केल्याप्रकरणी तेथीलच इमरान हरून बागवान, आयान इमरान बागवान आणि विवेक म्हेत्रे (पूर्ण नाव माहित नाही) रा. शनिवार पेठ, सातारा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक बोराटे करीत आहेत.

### बालविवाह प्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** मुलगी अल्पवयीन असतानाही तिचा बालविवाह लावल्या प्रकरणी तिघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ३१ डिसेंबर २०२३ रोजी एक वाजण्याच्या सुमारास शंकरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील तळे वस्ती, कोळेवाडा येथे सातारा शहरा शेजारी असणाऱ्या एका उपनगरातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह लावल्याप्रकरणी नितीन बसवेश्वर म्हमाणे, विश्वनाथ तम्मा म्हमाणे, लिंगादेव भारत म्हमाणे सर्व रा. शंकरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहेत.

### राहत्या घरातून युवती बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून एक युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ रोजी सकाळी नऊ वाजता करंजे परिसरात राहणारी एक २२ वर्षीय युवती राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार करपे करीत आहेत.

### पाईपलाईन फोडल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** जीवन प्राधिकरणची मेन पाईपलाईन फोडल्याप्रकरणी दोघांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास संगमनगर येथील कच्छी स्टील च्या समोरील पाईपलाईन मेगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेड हैदराबाद यांच्याकडून सातारा-टेंभुर्णी रस्त्याचे काम सुरू असताना फुटली.

यामुळे प्रचंड प्रमाणात पाणी वाया जाऊन पाण्याचा अपव्यय होऊन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी साईट सुपरवायझर सतीश कांत नायडू आणि जेसीबी चालक विवेक कुमार यादव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक तपास पोलीस नाईक भोंडवे करीत आहेत.

### ठाकरे गटाच्या शहरप्रमुखासह सहा जणांवर विनयभंगाचा गुन्हा

**सातारा :** ठाकरे गटाच्या शहरप्रमुखासह सहा जणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात विनयभंग, मारहाणीसह जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ रोजी रामराव नगर, गोडोली येथे वास्तव्यात असलेल्या एका महिलेस तिच्या पतीच्या मोबाईलवरून रात्री साडेआठ वाजता फोन आला. त्यावरून अनिकेत विश्वास साळुंखे, संतोष बबनराव शिंदे, ठाकरे गटाचे शहर प्रमुख शिवराज टोणपे, शैलेश नावडकर, डॉक्टर संजय ढाणे यांनी सांगितले की, तुमच्या नवऱ्याला पकडून बेदम मारले आहे. तुम्ही साईबाबा मंदिर, देशमुख हॉस्पिटल च्या समोर या. त्या अनुषंगाने संबंधित विवाहिता त्या ठिकाणी तिच्या दोन मुलींसह गेली असता वरील सर्वांनी तुमच्या पतीने आमच्याकडून एक करोड रुपये घेतले आहेत.

आमचे पैसे कसे वसूल करून घ्यायचे, ते आम्हाला माहिती आहे, असे म्हणून तिच्या पतीचा मोबाईल, तिच्या पर्समध्ये ठेवलेला तिचा सॅमसंग कंपनीचा टॅब यांसह तिच्या गळ्यातील तीन तोळे वजनाचे मंगळसूत्र ओढून काढून घेतले. तसेच महिलेसह तिच्या मुलींना हाताने, लाथा बुक्क्यांनी मारहाण करून कपडे फाडून महिलेचा विनयभंग केला आहे. याच वेळी संतोष शिंदे यांची मैत्रीण (नाव माहित नाही) रा. सदर बाजार सातारा हिने मी पोलीस आहे, असे सांगून संबंधित महिलेचे केस ओढून तिला रस्त्यावरून ओढत नेले.

याप्रकरणी अनिकेत विश्वास साळुंखे, संतोष बबनराव शिंदे, शिवराज टोणपे, शैलेश नावडकर, डॉक्टर संजय ढाणे, संतोष शिंदे यांची मैत्रीण (नाव माहित नाही) आणि इतर अनोळखी चार ते पाच जणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार संजय दिघे हे करीत आहेत.

# पाचगणी पालिकेने टेबललॅन्ड तलावातील गाळ काढला

## टेबललॅन्ड सौंदर्यात वाढ होण्याबरोबरच जलस्रोत वाढणार : मुख्याधिकारी निखिल जाधव

**पाचगणी :** पाचगणी व पांचगणी परिसरातील पाणी टंचाई दुर करणेसाठी आणि पाण्याचे स्रोत वाढविणेकरीता नगरपरिषदेने या वर्षी महत्वपूर्ण पाऊल उचलले असून या माध्यमातून आज टेबल लँड येथील तलावातील गाळ काढला. यामुळे टेबल लँडच्या सौंदर्यात भर पडणार असल्याचे यावेळी मुख्याधिकारी निखिल जाधव यांनी सांगितले.

सध्या पांचगणी शहरातील अनेक भागात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. यासाठी पूर्व नियोजन म्हणून पांचगणी नगरपालिकेने आज टेबल लँडवरील तलावातील गाळ काढला. पर्यावरणाचा कोणत्याही




प्रकारचा ऱ्हास होणार नाही याची खबरदारी घेऊन नगरपरिषदेने स्वः निधीतून तलावातील १८०० क्युबिक घनमिटर मातीचा गाळ जे.सी.बी. मशिन, ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे काढणेत आला.

**पांचगणी शहर हे सर्वात जास्त पर्जन्यवृष्टी होणारे शहर असूनही अलीकडे या शहरात पाणी टंचाईचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यासाठी आम्ही टेबल लँडवरील तलावातील गाळ काढल्याने परिसरातील विहिरी आणि झऱ्यांचे जलस्रोत मजबूत होण्यास नक्कीच मदत होणार आहे.**
**- मुख्याधिकारी निखिल जाधव.**

या तलावामधील गाळ काढल्याने पाऊसाच्या पाण्यामुळे तलावामध्ये १८ लाख लिटर पाण्याच्या साठयाची वाढ झालेली असून तलावामधील निघालेला गाळ हा टेबललॅन्ड वरील इतर तलावाच्या मातीच्या बंधा-याकरीता त्याचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे टेबललॅन्ड वरील इतर तलावाचे पाण्याचे साठयामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे.

याकामांमुळे पांचगणी आणि गोडवली परिसरातील शेतक-यांना त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात होणार असून या परिसरातील खार विहीरीमध्ये ही मोठ्या प्रमाणात भूजल पातळीमध्ये वाढ होणार. त्यामुळे पालिकेने हे उचललेले पाऊल स्वागतार्ह असल्याचे यावेळी नागरिकांनी सांगितले.



# विहीरीत पडलेल्या भेकराला जीवदान !

**खंडाळा :** पाण्याच्या शोधात असलेले भेकर पारगावनजीक विहीरीत पडल्याची मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शिडीच्या सहाय्याने विहीरीत उतरून भेकरास बाहेर काढून राखीव वन क्षेत्रात सोडून देण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी, खंबाटकी डोंगर परिसरात पाण्याचा तुटवडा जाणवत असल्याने वन्य प्राणी पाण्याच्या शोधात भटकत आहेत . अशातच दुपारी साडेचारच्या सुमारास पाण्याच्या शोधात असलेले भेकर तालुक्यातील पारगाव येथील मांगवाड नावाच्या शिवारामधील विहिरीत पडले आढळले.त्याला बाहेर पडणे अशक्य होते. तर त्या विहीरीत पोहुन पोहुन दमलेले भेकर शेतकऱ्याच्या दृष्टीस पडले. तेथे एकट्याला उतरणे अशक्य असल्याने त्या शेतकऱ्याने वनविभागाला याबाबत माहिती दिली.

खंडाळ्याच्या वनपरिक्षेत्र अधिकारी प्रियांका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल राहुल जगताप,वनरक्षक वसंत गवारी,प्रकाश शिंदे,वनमजूर दिपक आवटे,अक्षय कांबळे यांना घटनास्थळी दाखल होत,वनविभागाचे कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थ,शेतकऱ्यांची मदत घेत शिडीच्या साह्याने विहिरीत उतरले. त्यानंतर भेकरास बाहेर काढून पारगाव खंडाळा हद्दीतील वन राखीव क्षेत्रात त्याला सुखरूप सोडून देण्यात आले.

याबद्दल जिल्हा उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, सहाय्यक वनसंरक्षक रेशमा व्होरकाटे यांनी ' त्या वन कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

### छत्रपती शाहू महाराजांच्या पालखीचे साताऱ्यात स्वागत

**सातारा :** शाहू नगरीचे जनक आणि स्वराज्याचे चौथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्मभूमी ते कर्मभूमी जन्मोत्सव पालखीचे साताऱ्यामध्ये शिवतीर्थ येथे शनिवारी सायंकाळी उत्साहात स्वागत करण्यात आले.

येथील शिवतीर्थावर आयोजित छोटेखानी कार्यक्रमात येसूबाई फाउंडेशनचे अध्यक्ष सुहास राजेशिर्के हिंदू नृपती छत्रपती थोरले शाहू महाराज पालखी सोहळा समितीचे संस्थापक प्रमोद भोसले, महाड येथील समन्वय समितीचे अध्यक्ष भरत मोरे सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख इत्यादी मान्यवर पवई नाक्यावर उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराजांच्या पालखीचे मान्यवरांनी दर्शन घेऊन त्याला अभिवादन केले. शाहू महाराज पालखी सोहळ्याचे यंदा तिसरे वर्ष होते.

शुक्रवार दिनांक १७ रोजी गांगवली जिल्हा रत्नागिरी येथून छत्रपती थोरले शाहू महाराज पालखी सोहळा समिती सदस्यांच्या उपस्थितीत पालखीला अभिवादन करून तेथून मार्गक्रमणेला सुरुवात झाली. पालखीचे पारंपारिक ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले.

# एकीसाठी सरसावले एकीवकर

## गटबाजी संपवून दिला एकीचा संदेश...

**गावातील गटबाजी संपल्याने गावचा विकास होण्यास मदत होणार असून आमच्या गावाप्रमाणे ज्या गावात अशी गटबाजी आहे त्यांना हात जोडून कळकळीची विनंती आहे की अशी गटबाजी बंद करा. आमच्या गावाप्रमाणे आपणही एकत्र या. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपायी गावचा बळी देवू नका.**
**- प्रदीप बाबुराव कदम, सदस्य कास पठार कार्यकारी समिती.**

**कास पठार :** कास पठाराला लागून असलेले एकिव गाव हे निसर्गसंपदेने संपन्न असलेले गाव परंतु गेली आठदहा वर्षे एका गावात राहून ही एकामेकांचे कार्यक्रम बंदी, बोलीचाली तीही कामापुरती अशा परिस्थितीत गावच्या या गेलेल्या तड्याला सावरण्यासाठी एकीवकर सरसावल्याने दुहीची बीजे संपुष्टात आली आहेत.

कास पठारालगत जावली तालुक्यातील एकीव गाव आहे. या गावचे क्षेत्र कास पठारावर सुद्धा असल्याने गावचा कासचे व्यवस्थापन पाहणाऱ्या कास कार्यकारी समितीत ही एकीव गावचा समावेश आहे. प्रसिद्ध एकीवचा धबधबा ही याच गावात. पण निसर्ग सौंदर्य आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या या गावचा विकास मात्र शून्यच. याच कारण गावात नसलेला समन्वय आणि गटबाजी. आठ वर्षांपूर्वी काही कारणाने गावात दुफळी सुरू झाली. काही लोकांच्या महत्त्वाकांक्षामुळे सर्वसामान्य लोक दोन गटात विभागली गेली. कधी कोणाशी भांडणतंटा नसणारे ही गटागटात विभागले गेले. यातून लग्नकार्य वगैरे असेल तर ज्या गटाचा माणूस असेल तो गट सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम पार पाडत तर विरोधी गटातील लोक फक्त अक्षता टाकण्यासाठी जात.

इतर वैयक्तिक कार्यक्रमात असेच चाले. पण गावचे, देवाचे काही वार्षिक कार्यक्रम असतील तर एका गटाने उत्सव केला तर दुसरा गट सामिल न होता दुसऱ्या दिवशी देवाचे दर्शन घेई. अशा पद्धतीने गावातील सामाजिक एकोपाच नाहीसा झाला होता. यातूनच समन्वयाला धुमारे फुटत काही वैचारिक लोकांच्या पुढाकाराने ही दुही संपवण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. गेल्या आठ वर्षांच्या कालावधीत या दुहीमुळे काय फायदे झाले. काय तोटे झाले याचा अभ्यास करण्यात आल्यावर असे लक्षात आले की दुहीमुळे गावचेच प्रचंड नुकसान होत आहे.

कधी एकामेकांशी भांडण नसणारे ही गटामुळे एकामेकाच्या विरोधात आहे. यातून गावातील सर्व ग्रामस्थ, तरूण मंडळ यांनी एकत्रीत येत गावची मिटींग घेतली. यामध्ये गटबाजीला प्रोत्साहन देणारे काही लोक आढळल्यास त्यांच्यावर सर्वानुमते कारवाई करण्याचे ठरवत आठ वर्षांपासून असलेली गटबाजी संपवून टाकण्यात आली. यापुढे गावचे रजिस्टर असणारे ग्रामस्थ मंडळ स्थापन करून या मंडळाच्या माध्यमातून गावचा कारभार एकमताने करण्याचे ही ठरवण्यात आले. एकीव गावच्या या निर्णयाने छोट्याशा गावातील दुफळी संपुष्टात येवून गाव समाधानाने एकत्र नांदणार आहे.

# क्षेत्र महाबळेश्वर येथे ट्राफिक जाम

## वाहनांच्या लांबच लांब रांगा

**- शुभम गुरव,**
**क्षेत्र महाबळेश्वर**

प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र असलेल्या क्षेत्र महाबळेश्वर येथे रविवारी पर्यटकांना ट्राफिक जाम समस्येचा सामना करावा लागला जवळपास वाहनांच्या २ ते ३ किलोमीटर पर्यंत लांबच लांब रांग लागली होती क्षेत्र महाबळेश्वर येथील मंदिर परीसर व येथील असणारा पॉइंट्स परीसर पाहण्यासाठी पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. यामुळे याठीकाणी पर्यटकांची मोठी गर्दी पहावयास मिळत असते.

मात्र पर्यटकांना याठीकाणी ट्राफिक जाम समस्येचा सामना करावा लागत असल्यामुळे पर्यटक वर्गामधून नाराजीचा सूर येत आहे.क्षेत्र महाबळेश्वरला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असतात क्षेत्र महाबळेश्वर हे जागतिक पर्यटनस्थळ तसेच धार्मिक स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.णारी ट्राफिक जामची समस्या ही खेदाची बाब मानली जात आहे.



**क्षेत्र महाबळेश्वर येथील तांबरी चौक परीसरात अशाप्रकारे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत (छाया: शुभम गुरव)**

### तांबरी चौक ते ऑर्थर सीट मार्गावर वाहतूक पोलिस नेमण्याची गरज

**क्षेत्र महाबळेश्वर येथील तांबरी चौक परीसर तसेच ऑर्थर सीट मार्गावर ट्रॉफिक जाम समस्याचा सामना पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर करावा लागत असून क्षेत्र महाबळेश्वर व ऑर्थर सीट परीसरात पर्यटकांची गर्दीही असते परीणामी याठीकाणी वाहतूकीची कोंडी होत असून याठिकाणी वाहतूक पोलिस नेमण्याची गरज असल्याच्या प्रतिक्रिया पर्यटकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.**

# हिंगणे येथे श्री जानुबाई देवी यात्रानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



**वडूज :** हिंगणे ता. खटाव येथे सालाबादप्रमाणे श्री जानुबाई देवीची यात्रा गुरुवार दि. २३ ते शनिवार २५ अखेर संपन्न होत आहे. त्यानिम्तिाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केलं आहे.

गुरुवार दि. २३ रोजी सकाळी ६.०० वा.श्री जानुबाई देवीस अभिषेक सकाळी १०.०० वा.जय हनुमान गजी मंडळ, शेवरी जय मल्हार गजी मंडळ पळशी, मायाक्का गजी मंडळ, दोरगेवाडी

यांचा गजी नृत्याचा कार्यक्रम दुपारी बारा वाजता श्री जानुबाई देवीस नैवद्य व महाआरती व उपस्थित गजी मंडळाचा कार्यक्रम सायंकाळी साडे सात वाजता पालखीतून भव्य मिरवणूक

व छबीना सोबत शौर्य गजी पथक, वडूज, सनई ताफा व फटाक्यांची आताषबाजी कार्यक्रम.

आतावबाजी सौजन्य : कै. सौ. कमल संभाजी पवार यांचे स्मरणार्थ श्री. संभाजी भगवान पवार यांचेतर्फे ,रात्री आकरा वाजता आर्केट्रा तुफान यांचा बहारदार कार्यक्रम शुक्रवार दि. २४ रोजी सकाळी नऊ वाजता वनिता कराडकर यांचा तमाशा दूपारी १२ वा.जानुबाई देवीची महाआरती

दुपारी ०२.०० वा.देवीची पालखी व स्थातून भव्य मिरवणूक शुभहस्ते : प.पू.१०८ श्री महंत सुंदरगिरी महाराज (मठाधिपती सेवागिरी देवस्थान, पुसेगांव) व श्री. त्र्यंबकानंद महाराज, दिवडी ता. माण व सर्व ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत सोबत महालक्ष्मी हलगी ग्रुप, मांडवे (नातेपुते) यांचे हलगी नृत्य सायंकाळी पाच वाजता निकाली कुस्त्याचे जंगी मैदान सायंकाळी सहा वाजता

देवीचा महाप्रसाद (वांग भाकरी) सौजन्य : श्री. वामन कृष्णा निकम, श्री. बापुराव मारुती निकम यांचेतर्फे रात्री साडे दहा वाजता वनिता कराडकर यांचा तमाशा शनिवार दि. २५ रोजी सकाळी नऊ वाजता बैलगाड्यांच्या जंगी शर्यती,रात्रौ ९.३० वा. झंकार बिटस्, कोल्हापूर हा कार्यक्रम तसेच थंड पुण्याचे पाणी सौजन्य : युवा उद्योजक संदिपशेठ निकम,मिलींद शेठ निकम मित्र परिवार, हिंगणे यांचे तर्फे रविवार दि. २६ रोजी सायं. ०७.०० वा.संकष्टी चतुर्थी निमित्त महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. तरी परिसरातील भाविक भक्तांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन हिंगणे

समस्त ग्रामस्थ मंडळ, श्री जानुबाई देवी यात्रा कमेटी यांनी केले आहे.

# तरडगावातील बसस्थानक पुलाचे काम अजूनही अपूर्ण अवस्थेत

**तरडगाव :** पुढील महिन्यात २९ जून रोजी आळंदी येथून माऊलींच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान होत असून फलटण तालुक्यातील तरडगाव येथे ८ जुलै रोजी सोहळा एक दिवसाच्या मुक्कामासाठी येत आहे. मात्र बसस्थानक येथील पुलाचे काम अजूनही अपूर्ण अवस्थेत आहे. तसेच काही दिवसांनी पावसाळा सुरू होणार आहे. अशात हे काम पूर्ण होणार की नाही? याबाबत प्रश्न निर्माण होत आहे. पालखी तळ लगत पुलाचे काम पूर्ण होवून तो वाहतुकीसाठी खुला झाल्याने सर्वांना येथील दुसऱ्या पुलाच्या पूर्णत्वाची प्रतीक्षा लागली आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा व त्यामधील चांदोबाचा लिंब येथील उभे रिंगण यामुळे अवघ्या राज्याला परिचित असणार सांप्रदायिक गाव म्हणजे तरडगाव होय. आषाढी वारीतील पालखी सोहळ्याचा येथे एक दिवस मुक्काम असतो. वारीत सहभागी वारकऱ्यांची गैरसोय होवू नये यासाठी दरवर्षी तात्पुरत्या योजना केल्या जातात.

मात्र वर्षानुवर्षे बसस्थानक परिसरात रखडलेल्या कामामुळे आजवर नागरिक व प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे.आळंदी - पंढरपूर - मोहोळ या पालखी



मार्गाच्या सहापदरीकरण कामात तरडगाव मधील पालखी तळ लगत व बसस्थानक परिसर या दोन ठिकाणी पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले.सुरुवाती पासून संथ गतीने सुरू राहिलेल्या या कामातील पालखी तळ येथील पुलाचे काम पूर्ण होवून त्यावरून सध्या वाहतूक सुरू झाल्याचे दिसत आहे. मात्र बसस्थानक येथील पुलाचे काम अजूनही पूर्णावस्थेत न आल्याने अनेक समस्या निर्माण होत आहेत.सध्या अपूर्णवस्थेतील पुला शेजारून एकेरी वाहतूक सुरू असल्याने वाहतूक व्यवस्था पूर्णतः कोलमडली आहे. काम संथगतीने सुरू राहिल्याने व्यवसायिकांना देखील मोठा फटका बसला आहे. तर धुळीचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.

**'सबंधित विभागाने पालखी सोहळा व पावसाळा या गोष्टी लक्षात घेवून यापूर्वीच योग्य नियोजन करून पुलाच्या कामाची पूर्तता करणे आवश्यक होते.**
**नैसर्गिक आपत्तीत अशी कामे सुरू ठेवणे शक्य नसते. काम पूर्ण न झाल्यास याचा फटका वारकऱ्यांसह सर्वांना बसेल. तो बसू नये याची दक्षता घेण्यात यावी.**
**सतीश गायकवाड, संस्थापक अध्यक्ष**
**माऊली सेवा दल,तरडगाव**

वाहतूक कोंडी अन् सुरू असलेल्या कामामुळे परिसर पूर्णतः बदलून गेल्याने बाहेरून एखादा प्रवाशी येथे आला तर बसस्थानक कुठे आहे? असा प्रश्न विचारताना तो दिसतो.काम पूर्णत्वास झाल्यावर समस्या दूर होतील मात्र सध्याची परिस्थिती पाहता नागरिक,प्रवाशी वर्ग ,व्यवसायिक यांचा विचार करता त्यांना भेडसावणाऱ्या इतर अडचणी दूर करण्यासाठी व वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे.

तसेच पालखी आगमनापूर्वी या पुलाचे काम पूर्ण न झाल्यास पालखी सोहळ्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागेल अशी चर्चा होताना दिसत आहे.

ते 'वळण' होणार का सरळ?२०१० पासून चौपदरीकरण रस्त्याच्या कामात रखडलेले तरडगाव ओढया जवळील अपघाती वळण अजून जैसे थे आहे. आजवर रात्रीच्या सुमारास रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघात घडून यामध्ये अनेक जखमी झाले आहेत.तर काहीना जीवास मुकावे लागले आहे.अपघात झाल्यावरच यावर केवळ तात्पुरत्या उपाय योजना झाल्या आहेत.